वृत्तपत्राचे नाव: दै. सकाळ प्रकाशन स्थळ : सातारा दिनांक : १३.६.२०२१

# तिसरी लाट थोपविण्यासाठी पुढाकार घ्या

## पालकमंत्री बाळासाहेब पाटील; भारत फोर्ज कंपनीकडून २४ गावांना कोविड प्रतिबंधात्मक साहित्याचे वाटप

**सातारा, ता. १२ :** कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत देशाचे, राज्याचे व जिल्ह्याचे नुकसान झाले आहे. महसूल, पोलिस व आरोग्य विभाग कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून काम करीत आहेत. आता कोरोनाची तिसरी लाट येण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. या लाटेचा प्रभाव रोखण्यासाठी शासनाच्या सर्व विभागांची मदत घेऊन तिसऱ्या लाटेचा अधिकचा प्रभाव जाणवणार नाही, यासाठी आतापासूनच प्रयत्न सुरू केले पाहिजे. या कामात नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

पुणे येथील भारत फोर्ज कंपनीच्या सी. एस. आर. निधीतून सातारा जिल्ह्यातील कोरेगाव, खटाव व माण तालुक्यांतील एकूण २४ गावांना कोविड १९ साठी लागणाऱ्या भौतिक सुविधा व साधनांचे वितरण धामणेर (ता. कोरेगाव) येथे पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जिल्हाधिकारी शेखर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, प्रांताधिकारी ज्योती पाटील, तहसीलदार अमोल कदम, भारत फोर्जच्या लीना देशपांडे, सुनील माने, शहाजी क्षीरसागर यांच्यासह विविध गावांचे सरपंच उपस्थित होते.




**धामणेर : भारत फोर्ज कंपनीच्या वतीने दिलेल्या कोरोना प्रतिबंधक साहित्याचे वितरण करताना बाळासाहेब पाटील, त्या वेळी शेखर सिंह, लीना देशपांडे, विनय गौडा आदी.**

भारत फोर्जच्या वतीने कोरेगाव, खटाव व माण तालुक्यांतील २४ गावांत विविध विकासात्मक कामे सुरू आहेत, असे सांगून श्री. पाटील म्हणाले, ''भारत फोर्जचा उपक्रम अतिशय चांगला असून, त्यांच्या कामाची व्याप्ती वाढवून विविध गावांचा विकास केला पाहिजे. २४ गावांची गरज ओळखून कोरोनाच्या लढ्यासाठी लागणारी औषधे व इतर साहित्य आज पुरविले आहे.''

शेखर सिंह म्हणाले, ''गावोगावी विलगीकरण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे कोरोना रुग्णांना चांगला दिलासा मिळालेला आहे. ग्रामदक्षता समितीचे काम चांगल्या पद्धतीने सुरू आहे. गावांना भेटीवेळी सांगितल्या जाणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. भारत फोर्जचा उपक्रम स्तुत्य आहे.''

लीना देशपांडे म्हणाल्या, ''भारत फोर्जने गेली साडेतीन वर्षे विविध गावांत काम करीत आहे. सातारा जिल्ह्यातील २४ गावांमध्ये पाणी, आरोग्य, अंतर्गत रस्ते, गटारे, शिक्षण यासाठी काम करत आहे. हे काम करीत असताना नागरिकांचे सहकार्य मिळाले. ही २४ गावे आदर्श गाव म्हणून पुढे येतील.'' शहाजी क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले.